CMYK

धनंजय मुंडेंवर आरोप करणाऱ्या रणजीत कासलेवर तिसरा गुन्हा दाखल, व्यापाऱ्याकडून सहा लाख घेतल्याचा आरोप >> पान 2

सरकारला उशिरा शहाणपण आले >> पान 3

महिला जीव धोक्यात घालून भर उन्हात आणतात हंडाभर पाणी >> पान 4

**सुविचार**

नेहमी प्रामाणिक राहा, कारण प्रामाणिकपणातच यश आहे.


# दैनिक आपला विदर्भ

apalavidarbhlivenews@gmail.com

मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 03 रे ■ अंक 248 ■ सोमवार, दि. 21 एप्रिल 2025 ■ पाने 4 ■ किंमत रू. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006




सई ताम्हणकर साकारणार बीएसएफ जवानाच्या पत्नीची भूमिका, ग्राउंड झीरोमध्ये इम्रान हाश्मी सोबत महत्त्वाचा रोल

आतील पान

# पिंक ई-रिक्षा हे महिला सक्षमीकरण आणि सुरक्षेच्या दिशेने महत्त्वाचे पाऊल : मुख्यमंत्री

■ मुख्यमंत्र्यांच्या हस्ते पात्र महिलांना ५० पिंक ई-रिक्षांचे वितरण

■ मुख्यमंत्र्यांनी केला पिंक ई-रिक्षातून प्रवास

दैनिक आपला विदर्भ

**नागपूर/प्रतिनिधी :** महाराष्ट्र शासनाने महिला सक्षमीकरणाच्या दिशेने विविध निर्णय घेतले असून त्याची प्रभावी अंमलबजावणी सुरू आहे. महिला व बाल विकास विभागाच्यावतीने महिलांद्वारे महिलांसाठी संचालित पिंक ई-रिक्षा योजनेच्यामाध्यमातून महिला सक्षमीकरण आणि त्यांच्या सुरक्षेच्या दिशेने महत्त्वाचे पाऊल पडल्याचे प्रतिपादन, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज येथे केले. लाभार्थी महिलेच्या पिंक ई-रिक्षातून प्रवास करत त्यांनी महिलांना कृतिशील विश्वासही दिला.

>> पान २



## विधानसभा निवडणुकीआधी मी राजीनामा दिला, पण...; समीर भुजबळांचा मोठा दावा

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** विधानसभा निवडणुकीआधी समीर भुजबळ (एरसी ँप्लरं) यांनी राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाच्या मुंबई शहराध्यक्ष पदाचा राजीनामा दिला होता. नांदगाव विधानसभा मतदारसंघ (ऱ्हुरदह ण्दहूलहम्ब) भयम ुक्त करण्यासाठी मी निवडणूक लढवणार असल्याची घोषणा समीर भुजबळ यांनी केली होती. महायुतीकडून सुहास कांदे (एल्पे खह्) यांना पुन्हा एकदा संधी दिली देण्यात आली होती. तर महाविकास आघाडीकडून शिवसेना ठाकरे गटाने गणेश धात्रक (उरहो प्रीरज्ञ) यांना निवडणुकीच्या रिंगणात उतरवले होते. या लढतीत सुहास कांदे यांनी दणदणीत विजय मिळवला होता. समीर भुजबळ यांना परभवाचा धक्का सहन करावा लागला होता. आता समीर भुजबळ यांनी राजीनाम्याबाबत मोठं भाष्य केलं आहे.

# दोन भाऊ एकत्र आलेले काहींना आवडत नाही

## खासदार संजय राऊत यांची पत्रकार परिषदेत आरोप

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे हे एकत्र येत असाना काही लोकांना समविचारी पक्ष एकत्र केलेले आवडत नाहीत, भाऊ एकत्र आलेले आवडत नाहीत. असा आरोप खासदार संजय राऊत यांनी पत्रकार परिषदेमध्ये केला. यावेळी ते म्हणाले की, उद्धव ठाकरेंनी प्रतिसाद दिला. यात कुठे अटी शर्ती आल्यात. दोन प्रमुख नेते भाऊ आहेत. ते महाराष्ट्र हितासाठी एकत्र यायच्या विषयांवर सहमती होत आहे. तर, त्यामध्ये फार वाद विवाद करणे योग्य नाही, या मताचा माझ्यासारखा माणूस पण आहे. अटी शर्ती कुठल्याच नाहीत. राज ठाकरेंचे म्हणणे आहे. महाराष्ट्र हितासाठी, उद्धव ठाकरे यांचे म्हणणे आहे.महाराष्ट्र हितासाठी,महाराष्ट्र हिताच्या फॉर्मुल्यात भाजप बसत नाही. या महाराष्ट्र हिताच्या फॉर्मुलात भाजपासोबत इतर जण बसत नाहीत. याला अटी शर्ती म्हणत असतील तर, त्या व्यक्तीने राजकीय अभ्यास करणे गरजेचे आहे. आमची भूमिका स्पष्ट आहे.महाराष्ट्र हितासाठी काम करायला तयार



आहोत. मी राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे यांच्यासोबत एकत्र काम केलेलं आहे, महाराष्ट्र हित हेच आमचे ध्येय आहे. ज्या ध्येयासाठी बाळासाहेबांनी शिवसेनेची स्थापना केली. त्यासाठी सर्वांनी एकत्र यावे ही त्यांची भूमिका आहे. मतभेदाचे जोडे बाहेर काढून लोक एकत्र येणार असतील तर, त्याचं आम्ही स्वागत करू,कुठलीही अट आणि शर्ती उद्धव ठाकरेंनी टाकलेली नाही. महाराष्ट्र हिताचे शत्रू आहेत. त्यांच्या पंक्तीलाही बसू नका, ही कुठली अट आणि शर्त आहे. राज ठाकरे यांनी विधान केले आहे,त्यावर उद्धव ठाकरेंनी प्रति विधान केले आहे. महाराष्ट्राला सर्वोच्च प्राधान्य आहे. आमच्या घरात मोरारजी देसाई यांचा फोटो कोणी लावतं का? महाराष्ट्राचे शत्रू असलेले मोदींचा फोटो आम्ही लावणार नाही. त्यांनी महाराष्ट्र लुटला, महाराष्ट्र तोडण्याचा प्रयत्न केला. त्यांच्यासोबत राहणारे महाराष्ट्राचे शत्रू आहेत, हे इतकं स्पष्ट आहे. उद्धव ठाकरेंनी ही भूमिका मांडली आहे. ही भूमिका मराठी माणसांपर्यंत पोहोचली आहे. महाराष्ट्र द्रोही कोण हे देश जाणतो, तुम्हाला ते समजत नसेल तर राज ठाकरे यांना ट्रेनिंग स्कूल काढावे लागेल. ते सुज्ञ व्यक्ती आहेत, त्यांना माहित आहे, महाराष्ट्र द्रोही कोण ते आहेत.उद्धव ठाकरेंना देखील माहित आहे.जर कोणाला माहित नसतील तर चांगल्या कामात ते अडथळे निर्माण करत असतील असा प्रश्न होतो. एक अदृश्य शक्ती आहे.महाराष्ट्र दूर व्हायच्या पक्षामध्ये आहे. महाराष्ट्र हितासाठी प्रत्येक पाऊल टाकले पाहिजे हे उद्धव ठाकरेंची भूमिका आहे. असा वाद घालणे महाराष्ट्रात राहण्याच्या पथ्यावर पडेल.अमित शाह यांनी तामिळनाडू विरुद्ध भूमिका घेतली. परंतु, त्याचा तामिळनाडूतून अण्णा प्रमुख पक्ष गेला ना. एकनाथ शिंदे यांचा संताप कळू शकतो.देवेंद्र फडणवीस हे संताप दाखवणार नाहीत. पण त्यांच्या पोटात आतून ढवळढवळ असेल. त्यांचा आनंद किती खोटा असतो हे माहित आहे.आतापर्यंत काड्या घालण्याचे काम कॅफेत जाऊन कोणी केले हे आम्हाला माहित आहे. जो निर्णय घ्यायचा आहे ते उद्धव आणि राज ठाकरेचं घेतील, त्यामध्ये कोणी नाही कोणीही आपले मत व्यक्त करण्याची गरज नाही. एकनाथ शिंदे त्यांचं काम करतील, ते आता दरेगावात आहेत.ते त्यांच्या पक्ष प्रमुखांना भेटायला दिल्लीला जातील. दोन्ही बाजूंनी सकारात्मक पाऊस पडत आहे ते कमी आहे का? पुढचा भाग आताच सांगू शकणार नाही असे मत यावेळी खासदार संजय राऊत यांनी व्यक्त केले.

## तापमानाचा भडका! उपराजधानीत ४४.७ अंश परभणीत ४३.६ अंश

**मुंबई/प्रतिनिधी :** राज्यात सगळ्याच भागात तापमानाने नागरिक हैराण झाले आहेत. उष्णतेचा पारा टोक गाठत असल्याचे चित्र आहे. आज रविवार(२० एप्रिल) रोजी विदर्भ मराठवाडा प्रचंड तापला आहे. बहुतांश ठिकाणी ४०-४५ अंश सेल्सियसच्या नोंदी होत आहेत. आयएमडीने नोंदवलेल्या कमाल तापमानानुसार, आज राज्याच्या उपराजधानीत नागपुरात तब्बल ४४.७ अंश सेल्सियसची नोंद करण्यात आली आहे. हे राज्यातील सर्वाधिक तापमान आहे.

अकोल्याचा पारा ४४.३ अंश सेल्सियसवर आहे तर संपूर्ण विदर्भाचे तापमान ४० अंश सेल्सियसच्या पुढे आहे. मराठवाडाही चांगलाच तापला असून परभणीत ४३.६ अंश तर बीड ४२ अंशांवर स्थिरावले आहे. संपूर्ण कोकणपट्ट्यात तसेच मुंबई व मुंबई उपनगरात प्रचंड उकाडा जाणवतोय. उन्हाचा चटका असह्य झाला आहे. येत्या पाच दिवसांत सिंधूदुर्ग, कोल्हापूर, सोलापूर सांगलीत हलक्या पावसाची शक्यता वगळता अन्य कुठेही पावसाची शक्यता नसल्याचा हवामान विभागाचा अंदाज आहे.

आजपासून येत्या तीन दिवसात मध्य महाराष्ट्र व मराठवाड्यातील काही जिल्ह्यांना उष्ण व दमट हवामानाचा यलो अलर्ट देण्यात आला आहे. बीड, लातूर, धाराशिव जिल्ह्यांमध्ये प्रचंड उष्ण हवामान राहणार आहे. तर पुणे, सोलापूर जिल्ह्यातही आज उष्ण व दमट हवामानाचा इशारा देण्यात आलाय. २१ एप्रील रोजी छत्रपती संभाजीनगर, जालना, बीड, अकोला, नागपूरमध्ये उष्णतेचा यलो अलर्ट देण्यात आला आहे.

## नागपुरातील उमरेडमध्ये आकाशातून घरावर पडला भला मोठा ५० किलो धातूचा तुकडा, गूढ कायम

दैनिक आपला विदर्भ

**नागपूर/प्रतिनिधी :** जिल्ह्यातील उमरेड तालुक्यात पहाटेच्या सुमारास एक धातूचा मोठा तुकडा आकाशातून घरावर पडल्याने एकच खळबळ उडालीय. आकाशातून तुकडा घराच्या गच्चीवर पडला तेव्हा मोठा आवाज झाल्यानं स्थानिक नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरलंय. साधारणपणे ५० किलो वजन असलेला धातूचा तुकडा ज्यावेळी घरावर पडला, त्यावेळी पहाटेचे चार वाजले होते. त्यामुळे नागरिक गाड झोपेत होते. परंतु प्रचंड मोठा आवाज झाल्यामुळे सर्व लोक खडबडून जागे झाले आणि घाबरून घराबाहेर पडले.

धातूचा तुकडा नेमका कशाचा- नागपुरातील कोसे ले-आऊट भागातील स्थानिक नागरिक अमय बसवेश्वर यांच्या घरावर धातूचा भला मोठा तुकडा पडल्यानं छतावरील सुरक्षा भिंतीचा थोडा भागही तुटलाय. उमरेड पोलिसांना माहिती समजल्यानंतर त्यांनी घटनास्थळी जाऊन पाहणी केली. सदर धातूचा तुकडा कशाचा आहे, याबाबत माहिती समजू शकलेली नाही. पुढील तपास पोलिसांनी सुरू केला असून, हा तुकडा पोलीस ठाण्यात नेण्यात आला आहे.

पोलिसांनी जप्त केला धातूचा तुकडा- धातूचा तुकडा ५० किलो वजनाच आहे, अंदाजे १० ते १२ एमएम जाडीचा आणि ४ फूट लांब आहे. हा धातूचा तुकडा नेमका कशाचा आहे, याचा तपास सुरू आहे. आकाशातून पडलेला हा तुकडा नेमका कशाचा आहे हे तपासले जात आहे.

# मोतीबिंदू मुक्त महाराष्ट्र मिशन यशस्वीतेसाठी शासन कटीबद्ध : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

## विदर्भात वेस्टर्न कोलफिल्ड्स लिमिटेड संस्थेचे सहकार्य

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** नागरिकांचे आरोग्य प्राधान्यक्रमावर ठेवून नागरिकांच्या आरोग्य विषयक अनेकविध योजना शासनामार्फत सुरू करण्यात आल्या आहेत. वयस्क लोकांमध्ये मोतीबिंदूमुळे येणारी दृष्टिहीनता टाळण्यासाठी मोतीबिंदू मुक्त महाराष्ट्र मिशन यशस्वी करण्यासाठी राज्य शासन कटीबद्ध आहे. शासनाचे हे मिशन पूर्णत्वास नेण्यासाठी वेस्टर्न कोलफिल्ड्स लिमिटेड या संस्थेने सर्वतोपरी सहकार्यासाठी पुढाकार घेतला आहे, ही कौतुकास्पद बाब आहे, असे मत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केले आहे.

मोतीबिंदूमुळे येणारी दृष्टिहीनता आणि त्यावर उपाययोजना म्हणून २०१७ पासून मोतीबिंदू मुक्त महाराष्ट्र मिशन सुरू आहे.शासनाने हाती घेतलेल्या या मिशनची २०१८ मध्ये नव्याने सुरवात करण्यात आली आहे. येत्या २०२७ पर्यंत हे मिशन यशस्वीपणे राबविण्याच्या दृष्टिने विदर्भात वेस्टर्न कोलफिल्ड्स लिमिटेड () ही संस्था इंदिरा गांधी वैद्यकीय महाविद्यालय (आयजीएमसी), नागपूर यांना मदत करत आहे. डब्ल्युसीएल या संस्थेच्या माध्यमातून आयजीएमसी, नागपूर यांनी गेल्या वर्षभरात साधारण चार हजार मोतीबिंदूच्या शस्त्रक्रीया केल्या आहेत. तसेच शासनासोबत केलेल्या कराराच्या माध्यमातून मुख्यमंत्री यांच्या मोतीबिंदू मुक्त महाराष्ट्र मिशन स्वप्नपूर्तीसाठी वेस्टर्न कोलफिल्ड्स लिमिटेडने संपूर्ण विदर्भात विविध उपक्रम राबवून यापुढील तीन वर्षात दरवर्षी साधारण चार हजार मोतीबिंदू शस्त्रक्रिया करण्यासाठी देखील ही संस्था सहकार्य करणार आहे.

ही संस्था विदर्भातील ग्रामीण भागामध्ये शिबीर घेऊन ज्यांना मोतीबिंदू आहे त्या रुग्णाचे निदान करून त्यांना रुग्णालयामध्ये पोहोचवून त्यांच्यावर मोफत उपचार करतील. तसेच या मार्फत रुग्णालयांना आवश्यक पायाभूत सुविधा उपलब्ध करून देतील. डब्ल्यूसीएल संस्थेचे मोतीबिंदू मुक्त महाराष्ट्र मिशनच्या यशस्वीतेसाठी शासनाला असलेले सहकार्य पाहून इतर स्वयंसेवी संस्था देखील या कामात पुढाकार घेतील, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला आहे.



## रणजीत कासलेला निवडणुकीत परळीला ड्युटीच नव्हती, प्रशासनाकडून निवडणूक आयोगाला अहवाल सादर

**बीड/प्रतिनिधी :** बीड जिल्हा प्रशासनाकडून निवडणूक आयोगाला अहवाल सादर करण्यात आला आहे. ''विधानसभा निवडणुकीदरम्यान रणजीत कासलेला परळी मतदारसंघात ड्युटीच नव्हती. निवडणुकीदरम्यान रणजीत कासले सायबर पोलीस ठाण्यात कार्यरत होता,'' असा अहवाल पोलिसांनी प्रशासनाला आणि प्रशासनानं निवडणूक आयोगाला दिला आहे. सदर अहवाल हा गोपनीय स्वरूपाचा आहे. 'विधानसभा निवडणुकीत आपल्याला परळीला बंदोबस्त दिला. तसंच ईव्हीएम मशीन ठेवल्या, त्या ठिकाणी बंदोबस्त असतानाही तो बंदोबस्त काढण्यात आला. बँक खात्यावर दहा लाख रुपये पाठवले, त्यातील साडेसात लाख रुपये परत केले तर, अडीच लाख रुपये निलंबित झाल्यानंतर खर्च केला,'' असा दावा बीड पोलीस दलातील बडतर्फ पोलीस अधिकारी रणजीत कासलेनं केला होता.


CMYK

## मराठी शाळाच दर्जेदार

मार्च, एप्रिल महिन्यांमध्ये परीक्षा संपल्या की, विद्यार्थी निर्धास्त होतात कारण पुढील दीड दोन महिने त्यांच्यासाठी सुट्टीचे असतात. पण याच दोन महिन्यात पालकांना वेध लागतात ते आपल्या पाल्यांच्या पुढील शिक्षणाच्या प्रवेशाचे. दाखलपात्र विद्यार्थ्यांचे पालक म्हणजे ज्यांचे पाल्य पहिलीत दाखल होणार आहेत अशा पालकांमध्ये तर मोठा संभ्रम असतो. आपल्या पाल्यांना मराठी शाळेत दाखल करायचे की इंग्रजी शाळेत दाखल करायचे याबाबत त्या पालकांमध्ये मोठा संभ्रम असतो. मुलांचे शिकण्याचे माध्यम मराठी असावे की इंग्रजी यावर मग कुटुंबात मोठा खल होतो. नातेवाईक, शेजार पाजारी, मित्रमंडळी अशा पालकांना वेगवेगळा सल्ला देत असतात अशा वेळी कोणता निर्णय घ्यावा असा मोठा पेच या पालकांना पडतो. इंग्रजी भाषा ज्ञान भाषा असल्याने इंग्रजी माध्यमात शिक्षण घेण्याकडे बहुतेकांचा कल असतो आणि खरी फसगत इथेच होते. इंग्रजी येण्यासाठी इंग्रजी माध्यमातूनच शिक्षण घ्यावे असे काही नाही मराठी माध्यमातून शिक्षण घेऊनही मुल चांगल्या प्रकारे इंग्रजी शिकू शिकू शकते. आज जे उच्चपदावर बसलेले नामवंत व्यक्ती आहेत ते सर्व मराठी माध्यमातूनच आणि सरकारी शाळेतूनच शिकले आहेत. खरे तर आज जिल्हा परिषद आणि महानगर पालिकेच्या सरकारी शाळेतून दर्जेदार शिक्षण दिले जाते. आज मराठी माध्यमांच्या शाळा देखील कात टाकत आहेत. मराठी माध्यमांच्या सरकारी शाळेत गुणवान, प्रयोगशील, तंत्रस्नेही शिक्षक आहेत. सर्व शिक्षक डी एड, बी एड, एम एड असे उच्च गुणवत्ता प्राप्त आहेत. हे शिक्षक वेगवेगळ्या अध्यापन पद्धतींचा वापर करून विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण देतात. मराठी माध्यमांच्या शाळेत ई लर्निंग, ॲक्टिव्हिटी बेस लार्निंग च्या माध्यमातून शिक्षण दिले जाते. राज्यातील हजारो शाळा आय एस ओ नामांकन प्राप्त झाल्या आहेत. डिजिटल स्कूल, टॅब स्कूल या संकल्पना या शाळेतही रुजत आहेत. जिल्हा परिषद आणि महानगर पालिकेच्या शाळेतही आता सेमी इंग्रजी वर्ग सुरू करण्यात आले आहेत. गुणवत्तेच्या बाबतीतही या मराठी शाळा कोठे कमी नाहीत. ५ वी आणि ८ वी च्या शिष्यवृत्ती परीक्षेच्या गुणवत्ता यादीत सर्वाधिक विद्यार्थी हे जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थीच असतात. नुकताच जवाहर नवोदय परीक्षेचा निकाल घोषित झाला. यात जिल्हा परिषद शाळेतीलच सर्वाधिक विद्यार्थी गुणवत्ता यादीत आले आहेत. याशिवाय मंथन, प्रज्ञाशोध या स्पर्धा परीक्षेतही मराठी शाळांचाच डंका वाजतो. जिल्हा परिषद आणि महानगर पालिकेच्या सरकारी शाळेत मोफत शिक्षण दिले जाते. मोफत पाठ्यपुस्तके, मोफत गणवेश, मोफत शैक्षणिक साहित्य, शालेय पोषण आहार, विविध शिष्यवृत्त्या मिळतात. गुणवत्तेसह सह शालेय उपक्रमातही मराठी शाळा आघाडीवर असतात. मराठी शाळेत पहिलीत दाखल होणाऱ्या विद्यार्थ्यांचा मेळावा, सहल, वनभोजन, क्षेत्रभेट, मातृ – पितृ पूजन, आनंदी बाजार, स्नेहसंमेलन, क्रीडास्पर्धा, ग्रंथदिंडी, वृक्षदिंडी, विविध स्पर्धा सर्व महापुरुषांच्या जयंत्या असे विविध उपक्रम राबवले जातात. आता मराठी माध्यमांच्या सरकारी शाळांकडे पाहण्याचा दृष्टिकोनही बदलला आहे. ग्रामीण भागातील जिल्हा परिषदेच्या शाळेत इंग्रजी माध्यमांच्या शाळेतील विद्यार्थी दाखल होत आहेत. आता तर सर्वच मराठी शाळेत सीबीएएससी चा अभ्यासक्रम शिकवला जाणार आहे म्हणजे जे शिक्षण इंग्रजी माध्यमांच्या खाजगी शाळेत मिळते तेच शिक्षण आता मराठी माध्यमांच्या शाळेतही मिळणार आहे तरीही शहरातील पालकांना अजूनही इंग्रजी शाळेचा मोह सुटत नाही. इंग्रजी माध्यमांच्या शाळांच्या झगमगाटाला भुलून पालक त्या शाळांच्या नादी लागत आहेत. या इंग्रजी माध्यमांच्या शाळांनी शिक्षणाचा बाजार केला आहे . अगदी के जी च्या प्रवेशासाठीही लाखोंची देणगी घेतली जाते शिवाय इमारत निधी, ट्रस्ट निधी तसेच वर्षभर चालणारे वेगवेगळे कार्यक्रम या माध्यमातून पैसे उकळले जातात. पालकांच्या खिशाला कात्री लावण्यासाठी या शाळा वेगवेगळे फंडे शोधत असतात. जर एखाद्या पालकांनी फी भरण्यास उशीर केला तर विद्यार्थ्यांचे शिक्षण बंद करण्यापर्यंत मजल या शाळांची जाते. कोरोना काळात फी भरता न आलेल्या विद्यार्थ्यांना ऑनलाईन शिक्षणापासून वंचित ठेवण्याचे पाप काही इंग्रजी शाळांनी केले आहे. अनेक इंग्रजी शाळा शैक्षणिक साहित्य शाळेतूनच खरेदी करण्याची सक्ती केली जाते. २००३ मध्ये उच्च न्यायलयाने दिलेल्या निकालात शैक्षणिक साहित्य शाळेकडूनच किंवा ठराविक विक्रेत्यांकडूनच खरेदी करण्याची सक्ती करता येणार नाही असे म्हंटले आहे. सरकारनेही वेळोवेळी तसे आदेश काढले आहेत पण या शाळांना सरकारी आदेशाचा आणि न्यायालयाच्या निकालाचा विसर पडला आहे न्यायालये व सरकारला न जुमानता आपली शैक्षणिक दुकानदारी चालवणाऱ्या या शाळांना चाप लावायचा असेल तर पालकांनी आपल्या पाल्यांना या शाळेत दाखल करण्याऐवजी मराठी माध्यमांच्या शाळेत दखल करावे.

# धनंजय मुंडेंवर आरोप करणाऱ्या रणजीत कासलेवर तिसरा गुन्हा दाखल, व्यापाऱ्याकडून सहा लाख घेतल्याचा आरोप

**दैनिक आपला विदर्भ**



**बीड/प्रतिनिधी :** धनंजय मुंडे आणि राज्य सरकारवर आरोप करणारा बडतर्फ पोलिस उपनिरीक्षक रणजीत कासले याच्याविरोधात तिसरा गुन्हा नोंद करण्यात आला आहे. आईच्या उपचारासाठी म्हणून अंबाजोगाईतील व्यवसायिकाकडून सहा लाख रुपये घेतले पण वारंवार मागणी करुन ते परत केले नाहीत असा आरोप करत हा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सुधीर चौधरी असे फसवणूक झालेल्या व्यापाऱ्याचे नाव आहे.

रणजीत कासले हा अंबाजोगाई मध्ये कार्यरत असताना सुधीर चौधरी यांच्याशी त्याची मैत्री होती. या मैत्रीतूनच कासले याने आईच्या उपचारासाठी म्हणून सहा लाख रुपये उसने घेतले होते. पण वारंवार मागणी करूनही त्याने ते परत न केल्याने आता चौधरी यांच्या तक्रारीवरून अंबाजोगाई शहर पोलिस ठाण्यामध्ये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

गेल्या काही दिवसात रणजीत कासले याच्यावर दाखल झालेला हा तिसरा गुन्हा आहे. वेगवेगळे व्हिडिओ बनवत खळबळजनक दावे करणारा कासले हा सध्या शिवाजीनगर पोलिसांच्या कोठडीत आहे. या दरम्यान त्याच्यावर परळी आणि अंबाजोगाई येथे दोन गुन्हे दाखल झालेले आहेत.

ते दहा लाख मुलाच्या फीसाठी दिले, कंपनीचा दावा

परळी विधानसभा निवडणुकीच्या वेळी ईव्हीएमपासून दूर राहण्यासाठी आपल्याला १० लाख रुपये देण्यात आल्याचा दावा रणजित कासले याने केला होता. ही रक्कम बाळूमामा कन्स्ट्रक्शन कंपनीच्या अकाऊंटवरून आल्याचा दावा त्याने केला होता. त्यावर बाळूमामा कन्स्ट्रक्शन कंपनीच्या वतीने स्पष्टीकरण देण्यात आलं आहे.

रणजित कासलेला देण्यात आलेले दहा लाख रुपये हे त्याच्या मुलांच्या शाळेच्या फी साठी दिल्याचा दावा बाळूमामा कन्स्ट्रक्शनचे सुदर्शन काळे यांनी केला. आपले पैसे मिळावे यासाठी काळे यांनी बीड पोलिसांना महिनाभरापूर्वीच अर्ज दिला होता. कासलेने साडेसात लाख रुपये पुन्हा दिल्याचे देखील काळे यांनी म्हटले आहे. परंतु ईव्हीएम पासून दूर राहणे, वाल्मिक कराडचा एन्काऊंटर करणे या आरोपात तथ्य नसल्याचे देखील सुदर्शन काळे यांनी म्हटले.

वाल्मिक कराडच्या एन्काऊंटरची ऑफर, कासलेचा दावा

संतोष देशमुख हत्या प्रकरणी अटकेत असलेल्या वाल्मिक कराडचा एन्काऊंटर करण्यासाठी आपल्याला कोट्यवधींची ऑफर देण्यात आल्याचा दावा रणजीत कासले याने केला होता. ही ऑफर धनंजय मुंडेंनीच दिली असावी, कारण या प्रकरणी वाल्मिक कराड सर्व माहिती पोलिसांना देण्याची त्यांना भीती असेल असा दावाही रणजीत कासले याने केला. रणजीत कासले सध्या बीड पोलिसांना शरण गेला असून त्याला पोलिस कोठडी सुनावण्यात आली आहे.

पान १ वरून...

# पिंक ई–रिक्षा हे महिला सक्षमीकरण आणि सुरक्षेच्या दिशेने महत्त्वाचे पाऊल : मुख्यमंत्री

राज्य शासनाच्या महिला व बाल विकास विभागाच्यावतीने येथील नियोजन भवनात आयोजित कार्यक्रमात पिंक ई–रिक्षा योजनेअंतर्गत नागपूर जिल्ह्यातील ५० पात्र महिला लाभार्थ्यांना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते पिंक ई–रिक्षा वितरित करण्यात आल्या, त्यावेळी ते बोलत होते. महिला व बाल विकास मंत्री आदिती तटकरे, राज्यमंत्री मेघना साकोरे–बोर्डीकर, आमदार संदीप जोशी आणि डॉ. आशिष देशमुख, महिला व बालविकास विभागाचे सचिव डॉ. अनुप कुमार यादव, महिला व बाल विकास आयुक्त नयना गुंडे, जिल्हाधिकारी डॉ. विपीन इटनकर, महामेट्रोचे व्यवस्थापकीय संचालक श्रावण हर्डीकर आदी यावेळी उपस्थित होते.

मुख्यमंत्री म्हणाले, महिला सक्षमीकरणासाठी राज्य शासन कटिबद्ध असून विविध योजनांच्या माध्यमातून हे कार्य प्रभावीपणे सुरू आहे. महिला व बालविकास विभागाने पिंक ई–रिक्षा या महत्वाकांक्षी योजनेच्या माध्यमातून गरजू महिलांना रोजगार उपलब्ध करून दिला आहे. तसेच कामकाजी महिलांना या महिलांच्या ऑटो रिक्षामध्ये बसून सुरक्षित प्रवास करण्याची हमीही या योजनेने दिली आहे. नागपूर जिल्ह्यातील ५० पात्र लाभार्थी महिलांना ई–रिक्षा वितरित झाल्या असून जिल्ह्यात २ हजार महिलांना या योजनेअंतर्गत ई–रिक्षा वितरीत होवून रोजगार उपलब्ध होणार आहे.





नागपूर शहरातील विविध मेट्रो स्टेशनवर प्रवाशांना फिडरसेवा उपलब्ध करून देण्यासाठी महिला व बाल विकास विभाग आणि महामेट्रो दरम्यान करार झाला आहे. यातून पिंक ई–रिक्षाधारक महिलांना हक्काचा रोजगार उपलब्ध होणार आहे. राज्याच्या पर्यटन विभागासह अन्य विभागासोबत भविष्यात असे करार करून या महिलांना रोजगाराची संधी उपलब्ध करून देण्यात येईल, असेही त्यांनी सांगितले.

महिला व बाल विकास मंत्री अदिती तटकरे म्हणाल्या, राज्य शासनाने महिलांना रोजगार उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने महत्त्वाकांक्षी पिंक ई–रिक्षा ही योजना आणली आहे. राज्यातील आठ जिल्ह्यात ही योजना राबविण्यात येत असून पहिल्या टप्प्यात येत्या सहा महिन्यात पाच हजार रिक्षा वितरीत करण्याचे उद्दिष्ट आहे. नागपूर जिल्ह्यातील ५० पात्र महिला लाभार्थ्यांना ई –रिक्षा वितरित करून पहिल्या टप्प्यातील वितरणाची सुरुवात झाली आहे. या महिलांना किमान दहा दिवसांचे प्रशिक्षण देण्यात आले आहे. पाच वर्षांचा रिक्षाचा मेंटेनन्स आणि चार्जिंगची व्यवस्था ही त्यांना करून देण्यात आली आहे. महामेट्रो सोबत करार करून फिडर सेवेअंतर्गत या महिलांच्या ई–रिक्षाची सेवा उपलब्ध होऊन त्यांना रोजगारही मिळणार आहे. येत्या काळात विमानतळ, पर्यटनस्थळ अशा ठिकाणीही पिंक ई–रिक्षा सेवा उपलब्ध करून देण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.

मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांच्या हस्ते यावेळी प्रतिनिधिक स्वरूपात ११ पात्र महिला लाभार्थ्यांना ई–रिक्षाच्या चाव्या वितरित करण्यात आल्या.

मुख्यमंत्र्यांनी केला पिंक– ई–रिक्षातून प्रवास

कार्यक्रम संपल्यानंतर मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी नागपुरातील सन्याल नगर, टेका नाका नारीरोड येथील पूजा नरेंद्र वानखेडे यांच्या पिंक ई रिक्षातून महिला व बाल विकास मंत्री आदिती तटकरे आणि राज्यमंत्री मेघना साकोरे–बोर्डीकर यांच्यासह प्रवास केला. या पिंक ई रिक्षाचे पहिले प्रवासी होण्याचा मान मिळवत त्यांनी महिलांना विश्वासही दिला.

महिलांना रोजगार उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने महिला व बाल विकास विभागाच्या वतीने राबविण्यात येत असलेल्या महत्वाकांक्षी पिंक ई–रिक्षा योजनेअंतर्गत नागपूर जिल्ह्यात २००० पिंक ई–रिक्षा वितरित होणार आहेत. यासाठी २० ते ५० वर्षे वयोगटातील इच्छुक महिलांचे २०४० अर्ज प्राप्त झाले असून त्यापैकी जिल्हाधिकारी डॉ. इटनकर यांच्या अध्यक्षतेखाली गठीत समितीने १०३२ लाभार्थ्यांना मंजुरी देण्यात आली आहे. यापैकी ५० पात्र लाभार्थी महिलांना पिंक ई–रिक्षा वितरित करण्यात आले.

थोडक्यात योजनेविषयी

राज्य शासनाच्या महिला व बाल विकास विभागाच्यावतीने महिलांना रोजगार उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने पिंक ई–रिक्षा ही महत्वाकांक्षी योजना राज्यातील आठ जिल्ह्यांकरीता राबविण्यात येणार आहे. यात नागपूर जिह्यामध्ये २००० महिलांना पिंक ई–रिक्षा वाटप करण्याचे उद्दिष्ट दिलेले आहे.

या योजनेंतर्गत पुणे, नाशिक, नागपूर, अहिल्यानगर, अमरावती, संभाजीनगर, सोलापूर, कोल्हापूर या जिल्ह्यांत महाराष्ट्र शासनाकडून इच्छुक महिलांना रिक्षा खरेदी करण्यासाठी अर्थसहाय्य व ई–रिक्षा चालवण्यासाठी सोयी सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

# सई ताम्हणकर साकारणार बीएसएफ जवानाच्या पत्नीची भूमिका, ग्राउंड झीरोमध्ये इम्रान हाश्मी सोबत महत्त्वाचा रोल

## श्रीनगर मध्ये पार पडला सईच्या ग्राउंड झीरोचा ग्रँड प्रीमियर !

**दैनिक आपला विदर्भ**

**मुंबई/प्रतिनिधी :** सध्या सोशल मीडिया वर जिच्या चर्चा आहेत अशी एकमेव मल्टीटास्किंग क्वीन म्हणजे सई ताम्हणकर ! अभिनय आणि तिचं समीकरण कमालीचं आहे हे तिच्या प्रत्येक प्रोजेक्ट्स मधून अनुभवायला मिळतंय. उत्तम काम आणि तिच्या वैविध्यपूर्ण भूमिका कायम लक्षवेधी ठरत असताना सई आता ग्राउंड झीरो चित्रपटात झळकणार आहे.

इम्रान हाश्मी सोबत सई ग्राउंड झीरो मध्ये दिसणार असून ही फ्रेश जोडी पहिल्यांदाच प्रेक्षकांना बघायला मिळणार आहे. गेल्या काही दिवसांपासून तिच्या बॉलिवूड मधल्या कामाची रेलचेल बघायला मिळते असं म्हणायला हरकत नाही. सातत्यपूर्ण कामगिरी करून सई बॅक टू बॅक बॉलिवुड प्रोजेक्ट्स मध्ये सई तिच्या अभिनयाने प्रेक्षकांचं निखळ मनोरंजन करतेय.

ग्राउंड झीरो प्रदर्शित होण्यापूर्वीच या सिनेमाने एक अनोखा विक्रम केला आहे आणि संपूर्ण चित्रपटसृष्टी मध्ये याबद्दल एक वेगळीच चर्चा रंगली आहे. एक्सेल एंटरटेनमेंट निर्मित आणि मराठमोळ्या तेजस देऊस्करने दिग्दर्शित केलेल्या ग्राउंड झीरो या चित्रपटाचे श्रीनगरमध्ये रेड कार्पेट स्क्रीनिंग झालं आणि

भारतीय चित्रपटसृष्टीतील या ऐतिहासिक क्षणाचे साक्षीदार होण्यासाठी सई सोबतीने इम्रान आणि निर्माता फरहान अख्तर आणि चित्रपटातील इतर मंडळी श्रीनगरमध्ये गेली होती. सई ग्राउंड झीरो सिनेमात बीएसएफ जवान नरेंद्र दुबे यांच्या पत्नीची भूमिका साकारणार असून आता सईला ग्राउंड झीरो मध्ये बघण्यासाठी सगळेच उत्सुक आहेत.

श्रीनगरमध्ये झालेल्या ग्राउंड झीरो च्या ऐतिहासिक स्क्रीनिंगसाठी सईने खास लाल रंगाच्या सलवार सूटला पसंती दिली असून तिने सोशल मीडियावर तिच्या रेड कार्पेट लूकचे काही फोटोही शेअर केले आहेत. येणाऱ्या काळात सई अजून कमालीच्या आणि तितक्याच आव्हानात्मक भूमिका मोठ्या पडद्यावर साकारताना दिसणार आहे यात शंका नाही.




DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

## संक्षिप्त...

### डॉ. शिरीष वळसंगकर यांच्या आत्महत्या प्रकरणातील आरोपी महिलेला ३ दिवसांची पोलीस कोठडी



दैनिक आपला विदर्भ

**सोलापूर/प्रतिनिधी :** सोलापुरातील प्रसिद्ध न्युरोफिजिशीयन डॉ. शिरीष वळसंगकर यांच्या आत्महत्या प्रकरणातील आरोपी महिलेला ३ दिवसांची पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे.

डॉ. वळसंगकर यांना आत्महत्येला प्रवृत्त केल्या प्रकरणी आरोपी मनीषा माने या महिले विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला होता. सोलापूर सत्र आणि दिवाणी न्यायाधीश तथा न्याय दंडाधिकारी दीपक कंखरे यांनी सुनावली पोलीस कोठडी सुनावली आहे. आरोपी मनीषा माने ही डॉ. वळसंगकर यांच्या हॉस्पिटल मध्ये प्रशासकीय अधिकारी म्हणून कार्यरत होती. कामावरून काढल्याने आरोपी मनीषा माने हिने डॉ. वळसंगकर यांना स्वतः आत्महत्या करण्याची धमकी दिल्याची माहिती समोर आली आहे.

सदर बझारचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अजित लकडे यांनी ३ दिवसांची पोलीस कोठडी मागितली होती. दोन्ही बाजुचा युक्तिवाद लक्षात घेऊन, न्यायाधिशांनी पोलीस कोठडी सुनावली आहे. दरम्यान आरोपी मनीषा माने हिच्यासोबत या प्रकरणात आणखी कोणाचा सहभाग आहे का याचा तपास पोलीस करीत आहेत.अशी माहिती आरोपीचे वकील प्रशांत नवगिरे यांनी दिली.

### चोरट्यांकडून बँक फोडण्याचा प्रयत्न फसला, नागरिकांनी घटनास्थळी घेतली धाव



दैनिक आपला विदर्भ

**छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी :** वैजापूर शहरातील महाराष्ट्र ग्रामीण बँकेत चोरीचा प्रयत्न झाला. या घटनेत बँकेला आग लागली व संपूर्ण बँक जळून खाक झाली. या घटनेबाबत मिळालेल्या प्राथमिक माहिती नुसार वैजापूर शहरातील महाराष्ट्र ग्रामीण बँकेत चोरट्यांनी प्रवेश केला. बँकेत शिरल्यानंतर चोरट्यांकडून गॅस कटरच वापर सुरू असताना, अचानक स्फोट झाला व आग लागली. या स्फोटाच्या आवाजाने परिसरातील नागरिकांनी घटनास्थळी धाव घेतली. तेव्हा बँकेला आग लागल्याची घटना समोर आली. बँकेपासून काही अंतरावर पोलिस ठाणे देखील आहे. आवाजामुळे पोलिस देखील घटनास्थळी दाखल झाले होते. नागरिकांनी दिलेल्या माहितीअंतर्गत बँकेत चोरीचा प्रयत्न झाला होता. यात स्फोटामुळे बँकेचे शटर उडून चोरट्यांच्या गाडीत अडकले. ज्यामुळे चोरटे बँकेपासून काही लांब दूर लावलेल्या गाडीत बसून पसार झाल्याची माहिती नागरिकांकडून प्राप्त झाली आहे. आग लागल्यानंतर एक ते दीड तासाने अग्निशामक दलाची गाडी घटनास्थळी दाखल झाली. यामुळे नागरिकांनी एकच संताप व्यक्त केला आहे. वेळेच अग्निशामक दलाची गाडी आली असती, तर आग आटोक्यात आली असती. असे नागरिकांनी व्यक्त केले आहे. या घटनेत बँकेतील सर्वच समान जळून खाक झाले आहे.



# सरकारला उशिरा शहाणपण आले

## माजी खासदार राजू शेट्टी यांचा पत्रकार परिषदेत आरोप

दैनिक आपला विदर्भ

**नाशिक/प्रतिनिधी :** नाशिकमध्ये सर्व प्रश्न घेऊन आलो आहे. नाशिकमध्ये दोन दिवस दौरा काढला आहे. मंत्रालयात आम्ही कांदे घेऊन आंदोलन केले. आम्ही सगळे तुरुंगात गेलो. उशिरा पण सरकारला शहाणपण आले. कांद्याचे निर्यात शुल्क रद्द केले.अशी टिका माजी खासदार राजू शेट्टी यांनी पत्रकार परिषदेत केला.

यावेळी ते म्हणाले की, वेळेवर कांदा निर्यात शुल्क रद्द न केल्याने भाव पडले ही जबाबदारी सरकारची आहे. १५०० सरकारने हमी भाव द्यावा. आमचा नाफेडवर भरोसा नाही. १५०० रुपये सरसकट हमी भाव द्यावा. परभणी जिल्ह्यात १.५० लाखाच्या कर्जासाठी शेतकऱ्याने आत्महत्या केली. त्याच रात्री त्याच्या पत्नीने पण आत्महत्या केली. त्या महिलेची पोटात ७ महिन्याचे गर्भ होते. सुनील तटकरे यांच्या घरी एक वाटी आमरस आणि एक मोदक खायला जाण्यासाठी १.५ कोटी खर्च करून तिथे हॉलिपेट बनवले. सरकारला लाज वाटत नाही. हजारो कोटी तिकडे खर्चात करता, आणि शेतकऱ्यांसाठी एक रुपयाही देत नाही. महायुती सरकारने निवडणुकींपूर्वी घोषणा केली होती, कर्ज माफीची त्याच काय झाले. सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांना मदत होत नाही.



अजित पवार हे स्वतः शिस्तप्रिय नेते समजतात, पण त्यांना सरकारच्या तिजोरीची परिस्थिती माहिती असताना, मग ह्या घोषणा का केल्या ?असा प्रश्नही यावेळी शेट्टी यांनी केला. महायुती सरकारने घोषणा केली, त्याप्रमाणे सातबारा उतारा कोरा करावा. नाशिक जिल्हा मध्यवर्तीय सहकारी बँकमध्ये शेतकरी अवलंबून आहे. त्यावर शेतकरी यांना थकबाकीदार शेतकऱ्यांना कर्ज देत नाही. २ लाख ४० हजार शेतकऱ्यांची संख्या आहे. हे शेतकरी यांना थकबाकीदार असल्याने कर्ज मिळत नाही, त्यांना सावकारी आणि इतर बँकेकडून कर्ज घ्यावं लागत.

सरकारने नाशिक जिल्हा बँकेला भाव-भांडवल दिले, तर शेतकऱ्यांना मदत होईल. बँक पूर्वपदावर येईल. सरकारने आमदारांच्या सुरक्षेसाठी १ हजार कोटी रुपये खर्च केले. हे वळू इतके दिवस पोसले. ही आकडेवारी जाहीर करावी. शेतकऱ्यांसाठी सरकारकडे पैसे नाही.मायक्रो बँक १८ टक्क्यांनी कर्ज देते. ह्या गुंड्याना आम्ही दणका देणार. १५ दिवसात आम्ही तुम्हाला दाखवू.सरकारने जिल्हा बँकेला उसने पैसे दिले, तरी बँक जिवंत होईल. ६३५ कोटी मदत झाली, तर नाशिकची बँक पूर्वपदावर येईल.सरकारने १८२ कोटी वसूल करण्याची जबबदारी स्वाभिमानी शेतकरी संघटनेवर द्यावी.एवढ्या आपत्ती येऊन ५० हजार कोटी रुपये विमा कंपन्यांनी कमवले. ह्या मोठा घोटाळा होण्यामागे सरकार जबाबदार आहे.आम्ही आंदोलन केले म्हणून विम्याचे पैसे मिळाले.

राज्यात ५० हजार कोटी रुपयांचा नफा ह्या कंपनायांनी कमवले.विमा योजनेची खरी परिस्थिती समोर आली. मागच्या काळात खोट रेकॉर्ट करून पिक विमा काढला, अधिकारी निलंबित केले. त्यावर काही कारवाई नाही. याचा अर्थ सरकार यांना पाठिशी घालत आहे.वाहन अपघातात खर्च देतो, तशी भरपाई शेतकऱ्यांना दिली पाहिजे, ही आमची मागणी.लाडकी बहीण योजना ही मतदानासाठी मदत केली. लाच देण्याचे काम यांनी केले.बहिणला १५०० रुपये देण्यापेक्षा दवाखाना आणि मुलांना शिक्षण द्यावे, ही माझी भूमिका आहे.बच्चू कडू आंदोलन शेतकरी चळवळीमध्ये जे काम करतील त्यांना सोबत घेऊ. महायुती नेत्यांनी सातबारा कोरा करणार घोषणा केली. मात्र, मोठे उद्योगपतींचे माफ केले, पण शेतकऱ्यांना मदत नाही. ठाकरे बंधू ते सोबत येणार असेल तर आनंदच आहे. सोबत येण्याचा हेतू काय आहे, हे बघून त्यांच्या बद्दल बोलण योग्य ठरेल.आमची भूमिका ही सातबारा कोरा करण्याची पहिल्यापासून कठोर आहे, आम्ही येत्या काळामध्ये त्यावर सरकारच्या विरोधात लढत राहू.असे मत यावेळी शेतकरी नेते तथा माजी खासदार राजू शेट्टी यांनी व्यक्त केले.

# आम्हाला कोणाबद्दल पोटदुखी नाही

## मंत्री उदय सामंत यांची प्रतिक्रिया

दैनिक आपला विदर्भ

**सिंधुदुर्ग/प्रतिनिधी :**उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे सिंधुदुर्ग दौर्यावर आभार मानण्यासाठी २४ तारीखला दौरा आहे. यावेळी हजारोंच्या संख्येने शिवसैनिक उपस्थित राहतील. फार मोठ्या ताकदीने सिंधुदुर्गाचे नेते एकनाथ शिंदे यांचे स्वागत करतील आणि शिवसेना सिंधुदुर्गमध्ये एक नंबरला आहे हे दाखवून देतील.अशी प्रतिक्रिया मंत्री उदय सामंत यांनी माध्यमांशी बोलताना दिली.

यावेळी ते म्हणाले की, एखादी व्यक्ती चांगले काम करायला लागले की, त्याचे राजकीय शत्रू वाढतात. तीच परिस्थिती निलेश राणे यांच्याबाबतीत सिंधुदुर्गात होत आहे. प्रामाणिकपणे निलेश राणे हे मतदारसंघामध्ये काम करत आहेत. अन्यायाची चीड असल्यामुळे ज्याच्यावर अन्याय होतो, त्यांच्या बाजुने ते उभे राहतात. अशाप्रकारे आरोप-प्रत्यारोप केल्यानंतर निलेश राणे, यांच्या कामाची स्पीड कमी होईल. परंतु, याच्यातूनच ते अजून ऊर्जा घेतील आणि डबल स्पीडने काम करतील. अशी आम्हाला खात्री आहे.



राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे एकत्र आले तर, आम्हाला कोणाबद्दलची पोटदुखी नाही. स्थानिकांना नव्याने सामावून एकनाथ शिंदे यांनी घेतले. मनसेचे पक्षप्रमुख राज ठाकरे हे स्वतःचे विचार असलेले एक नेतृत्व आहे. त्यांला जर कोणी झुकवण्याचा प्रयत्न करत असेल तर, ते अजिबात झुकू शकत नाहीत. त्यांनी अटी घातल्या की शाळेसारख्या त्यांनी बीजेपीबरोबर बोलायचे नाही, देवेंद्र फडणवीस यांच्याबरोबर बोलायचं नाही, शिंदेंची सावली पडता कामा नये. दिल्लीतील लोकांच्या संपर्कात राहता कामा नये. हा क्रीडा महोत्सव चालू आहे का? युतीचे बोलण्याअगोदर उबाठा पक्षप्रमुखांनी आमची माफी मागावी. मी यावर बोलण्या इतका मोठा नाही. असे मतही यावेळी मंत्री उदय सामंत म्हणाले.




### भिवंडी कल्याण मार्गावर MSEB विद्युत पुरवठा कंपनीचा ट्रान्सफर घेऊन आलेला कंटेनर रस्त्यात अडकला

**भिवंडी/प्रतिनिधी :** भिवंडी शहरातील कल्याण मार्गावर वरील कार्यालय असून, या कार्यालयामध्ये छत्रपती संभाजी नगर येथून निघालेला MSEB कंपनीचा विद्युत पुरवठा करणारा ५० टन चा कंटेनर रिव्हर्स मारत असताना रस्त्यामध्ये अडकला आहे. त्यामुळे भिवंडी कल्याण या मार्गावर मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी झाली असून, ही वाहतूक कोंडी सोडण्यासाठी वाहतूक विभागाचे अधिकारी देखील दाखल झाले आहेत. वाहतूक सुरळीत करण्याचे प्रयत्न वाहतूक विभागाकडून सुरू आहेत.

## ठाकरे बंधू एकत्र आले तर मला आनंद होईल : छगन भुजबळ

दैनिक आपला विदर्भ

**नाशिक/प्रतिनिधी :** सगळीच कुटुंब एकत्र आली तर फार बरं होईल, राज आणि उद्धव ठाकरे एकत्र आले तर, मला आनंदच होईल, असे मत यावेळी छगन भुजबळ यांनी माध्यमांशी बोलताना व्यक्त केले.



ते म्हणाले की, वेगवेगळे विषय आहेत, सगळ्याच विषयावर मी सगळ्यांशी सहमत असेल असे नाही, दक्षिण भारत हिंदी प्रचार सभा, महात्मा गांधींनी स्थापन केले, हिंदी प्रचारासाठी हिंदीचा प्रचार सगळ्यात जास्त हिंदी सिनेमांनी केला. घराघरात दक्षिणेत सुद्धा चित्रपट बघितले जातात. आजच्या या जमान्यात सायन्स, टेक्नॉलॉजी इतर ज्या गोष्टी आलेल्या आहेत, पूर्वी त्या नव्हत्या. कदाचित त्याच्यामध्ये आपल्या मुला मुलींना प्राविण्य मिळावे त्यांना हुशार करणे गरजेचे आहे. मराठी शिवाय पर्याय नाही. मराठी शिकलंचं पाहिजे, मुलांनी सगळ्या भाषा शिकल्या पाहिजे, मोठ्या शिक्षण तज्ञांनी सांगितलं सक्ती करू नका, जी भाषा शिकायची शिकू द्या,राज्यात बॉर्डर जवळ गेल्यावर तिकडची भाषा शिकायला लागतात. बोलायला लागतात. आपल्या बाजूचे प्रांत आहेत. त्या भाषा मुले मुली शकत असतात, तज्ञांचा सुद्धा सगळ्यांनी ऐकावे विचार करावा. कंपल्शन शिकलेले आणि कंपल्शन करणारे कंपल्शन करायचे तर, मराठीच करा सायन इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजीचं करा, उद्धव आणि राज ठाकरे माझ्यासारखे बाळासाहेबांचं जवळून काम करणारे आहे. दोघे एकत्र आले तर मला आनंद होईल. मला जेव्हा कळले राज ठाकरे बाजुला जात आहेत. त्यावेळी बारा वर्षे शिवसेना सोडली तर, कोणाशी बोलत नव्हतो. मला कळाल्यानंतर मी स्वतःहून राज ठाकरेंना, उद्धव ठाकरेंना फोन केला. मी सांगितले माझे ऐका आठ दिवस शांत राहा, त्याप्रमाणे ते राहिले, दुर्दैवाने जे व्हायचे ते झाले. हा सुद्धा ते दोघे एकत्र झाले तर, माझ्यासारखा आनंद कोणाला होणार नाही. माझा पक्ष वेगळा आहे. बाळासाहेब असतानाच मी बाहेर पडलो आहे. शिवसेनेबद्दल आमचे प्रेम कमी झालेले नाही. सगळीच कुटुंब एकत्र आली तर फार बरं होईल, आपलं आपलं राजकारण करत राहा, ठाकरे युतीचा परिणाम निश्चितपणे होईल, शिवसेनेची शक्ती वाढेल. दोन कार्यकर्ते आम्हाला मिळाले तर, शक्ती वाढल्यासारखे वाटतं हे तर लीडर आहेत. एखादा पडलेला आमदार सुद्धा आम्ही आमच्यात घ्यावा शक्ती वाढेल हे तर लीडर आहेत.असे मत माजी मंत्री छगन भुजबळ यांनी व्यक्त केले.

## दोन परिवार एकत्र असतील तर, आम्ही स्वागत करू : माजी आ. हर्षवर्धन सपकाळ

दैनिक आपला विदर्भ

**पुणे/प्रतिनिधी :** भाजप राज्याच नुकसान करत आहे. हे स्पष्ट आहे. राज्यातून अनेक उद्योग बाहेर जात आहेत, महायुती राज्याच्या मुळावर उठली आहे. अस त्यामागचा अर्थ असावा.भाजप महाराष्ट्र धर्माच्या विरोधात आहे. भाजप आपल्याला संस्कृती आणि भाषा पासून तोडत आहेत. राज ठाकरेंची भूमिका म्हणजे इशारा आहे. राज ठाकरे यांचा भाजपने भ्रमनिरास केला आहे. बाप आणि पोर पळवणारा आमचा विचार नाही. अशी टीका भाजपवर करून आम्ही दोन परिवार एकत्र असतील तर, आम्ही स्वागत करू आम्ही जोडणारे आहोत, तोडणारे नाही. असे मत काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी पत्रकार परिषदेमध्ये व्यक्त केले.



यावेळी ते म्हणाले की, महाविकास आघाडीला प्रस्ताव दिला तर विचार करू, त्यांची भूमिका काँग्रेस म्हणून पर्याप्त आहे. हिंदी भाषा सक्तीच्या आम्ही विरोधात आहोत. मराठी भाषेची गळचेपी होत आहे.आमच लक्ष याकडे वेधयचा आहे. सक्तीच का केलं जात आहे, हे कारस्थान आहे. भाजप सगळ करत आहे, भाजप यामागे द्वेष पसरवत आहे. हिंदी हिंदू आणि हिंदू राष्ट्र असे भाजपला करायचे आहे. संजय राऊत यांची धरसोड वृत्ती आहे.भाजपने अनेकना संपवलं आहे. त्यांनी असा निर्णय घेऊ नये.

तुम्ही खूप दिवस झाले पक्षात आहात. विनंती करतो असा निर्णय घेऊ नये, भाजपा तुमचा भारमनिरस करेल. मी सातत्याने त्यांच्या संपर्कात आहे. संपर्कात नाही अस बोलणं चुकीच आहे.मी त्यांच्याशी बोलण्याचा पर्यंत करत आहे. अशी माहिती काँग्रेसचे महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष तथा माजी आमदार हर्षवर्धन सपकाळ यांनी पत्रकार परिषदेमध्ये दिली.

## श्री महादेव यांच्या यात्रा मोहत्सवात जंगी कुस्त्यांची दंगल ला प्रतिसाद

दैनिक आपला विदर्भ

**नांदेड/प्रतिनिधी :** छत्रपती शाहु महाराजांनी या महाराष्ट्रात घालुन दिलेल्या वारसा प्रमाने आर्धापूर तालुक्यातील मौजे देगाव कुऱ्हाडा येथे आज श्री. महादेव यात्रा मोहत्सवा निमित्ताने जंगी कुस्त्यांची भव्य दंगल आज संपन्न झाली. यात महाराष्ट्रातील काना-कोपऱ्यातुन पैलवान सहभागी झाले होते. या कुस्त्याची दंगलीत लाखो रुपयांची बक्षीस होती. ही कुस्त्यांची दंगल यशस्वीपणे पार पाडण्यासाठी यात्रा मोहत्सव पंचक मेटीने परीश्रम घेतले.





# महिला जीव धोक्यात घालून भर उन्हात आणतात हंडाभर पाणी

## कारेगावच्या फासे पारधी वस्तीवरचं विदारक वास्तव

**दैनिक आपला विदर्भ**


**यवतमाळ/प्रतिनिधी : दिवसाच्या पहाटेपासूनच या महिलांचा पाण्यासाठी संघर्ष सुरू होतो. ती पाण्याच्या शोधात भटकंती. भर उन्हात, डोक्यावर हंडे घेऊन, यवतमाळ जिल्ह्यातील कारेगावच्या फासे पारधी वस्तीवरचं हे विदारक वास्तव.**

दररोज दोन-तीन किलोमीटर पाणी आणण्यासाठी जावं लागतं. उन्हात अंग भाजतं, पण पर्याय नाही. पाण्याशिवाय राहून चालत नाही. खोल विहीरीत उतरून पाणी भरावं लागतं. बऱ्याच वेळा साप-विंचवाचा धोका असतो. पण काय करणार... दुषित पाण्यामुळे मुलांसह मोठी माणसं आजारी पडतात, पण स्वच्छ पाणी मिळत नाही.

कारेगांव फासे पारधी बेडा हा वनविभागाच्या जागेवर अतिक्रमण करून वसलेला आहेत. त्यामुळे वीज, रस्ते आणि पाण्याच्या योजना किंवा इतर शासकीय नियोजनेच्या लाभ फासे पारधी बेड्यावरील नागरिकांना मिळत नाही. आदिवासी विभागाचे तर पूर्ण दुर्लक्ष असल्याचा आरोप फासे पारधी समाजातील नागरिक करत आहेत.

या वस्तीच्या आजूबाजूला एक ते दिड किलो मिटर अंतरावर शेत शिवारात विहिरी आहेत. दुसऱ्याच्या शेतातून पाणी आणावं लागतं. पाणी आणतांना साप, विंचू अनेक महिलांना दंश केल्याच्या घटना घडल्यात. त्यामुळे पारधी समाजातील महिलांच्या मनात भीतीचे वातावरण आहे. तरी देखील त्यांना जीव धोक्यात घालून हंडाभर पाण्यासाठी रानावनात भटकंती करून पाणी आणावं लागतं. या समाजाला पिण्याच्या पाण्यासारख्या मूलभूत गरजेसाठी किती काळ वाट बघावी लागणार? एकविसावं शतक उजाडलं, सरकाराने शंभर दिवस पूर्ण केलं. घाटंजी पोलीस स्टेशन अंतर्गत येणाऱ्या कारेगावच्या फासे पारधी समाजाच्या या गंभीर प्रश्नांकडे शासनाने तातडीने लक्ष देणं आवश्यक आहे.

## इगतपुरी परिसरात भीषण पाणी टंचाई





**दैनिक आपला विदर्भ**

**इगतपुरी/प्रतिनिधी :** आदिवासी महिलांना जीव धोक्यात घालून पाण्यासाठी वणवण भटकंती करण्याची वेळ आली आहे. मात्र,शासन याकडे लक्ष देण्यास तयार नसल्याने नागरिकांमध्ये तीव्र रोष व्यक्त केला जात आहे. पावसाचे माहेरघर समजल्या जाणाऱ्या इगतपुरी तालुक्यातील अतिदुर्गम व भाग धरणाच्या माथ्यावर असलेल्या, दरेवडी येथील आदिवासी महिला भगिनींना आपल्या लेकरा बाळांना सोबत घेऊन, जंगलातून डोंगर दऱ्या उतरुन तीन किमीच्या अंतरावर असलेल्या भाम धरणावरून पाणी भरून परत डोंगर दऱ्या चढुन खडकाळ पायवाटेने घोटभर पाण्यासाठी कसरत करावी लागत आहे. आताच पाणीपुरवठा करणाऱ्या विहिरीचे पाणी आटल्याने, तसेच वाडीतील विहिरींनेही तळ गाठल्याने ही परिस्थिती उद्भवली आहे. सकाळी लवकर व सायंकाळी कामावरून आल्यानंतर महिलांना आपल्या लेकरा बाळांसह पाण्यासाठी वणवण करावी लागत आहे. तसेच जंगलातून येताना जाताना वन्य प्राण्यांची भिती असल्याने, आपला जीव धोक्यात घालून घोटभर पाण्यासाठी जावे लागत आहे.शासनाने याकडे लक्ष देशासनाने याकडे लक्ष देऊन पाणी समस्या निकाली काढावी अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

## आठवीच्या मुलाचा खेळ... गुगलचे सीईओ सुंदर पिचाई झाले वैभव सूर्यवंशीचे फॅन

हैदराबाद : आयपीएलच्या इतिहासात पदार्पण करणारा सर्वात तरुण खेळाडू बनून वैभव सूर्यवंशीनं इतिहास रचला आहे. बिहारच्या या मुलानं अवघ्या १४ वर्षे आणि २३ दिवसांच्या वयात राजस्थान रॉयल्सकडून लखनऊ सुपर जायंट्सविरुद्ध आयपीएलमध्ये पदार्पण केलं. सर्वात मोठी गोष्ट म्हणजे त्यानं त्याच्या पहिल्याच चेंडूवर एक मोठा षटकार मारला. त्याची दबंग शैली पाहून सर्वांनाच आश्चर्य वाटलं. गुगलचे सीईओ सुंदर पिचाई देखील वैभवचे चाहते झाले. इतक्या लहान वयात वैभवला मोठ्या गोलंदाजांविरुद्ध निर्भयपणे खेळताना पाहून ते खूप प्रभावित झाले आणि त्यांनी त्याचं खूप कौतुक केलं.

## राजूर घाटात ब्रेक फेल झाल्याने टँकर पलटी







**दैनिक आपला विदर्भ**

**बुलडाणा/प्रतिनिधी :** बुलढाणा तालुक्यातील धाडच्या दूध संकलन केंद्रातून दूध घेऊन अमर डेअरीचा टँकर बोदवडच्या प्रक्रिया प्लांटकडे जात असतांना राजूर घाटातील देवीच्या मंदिरा जवळील धोकादायक वळणावर टँकरचा ब्रेक फेल झाल्याने टँकर पलटी झाल्याची दुर्दैवी घटना घडली आहे. सुदैवाने हा टँकर डाव्या बाजूला पलटी झाल्यामुळे मोठी हानी टळली. यात टँकर चालकाला किरकोळ इजा झाली असली तरी जीवितहानी टळली आहे. घटनेची माहिती मिळताच बुलढाणा शहर ठाण्याची वाहतूक शाखेचे कर्मचारी घटनास्थळी दाखल झाले व वाहतूक व्यवस्था सुरळीत केली.

## मराठा जोडो अभियानांतर्गत जिजाऊ रथयात्रेचे खामगाव येथे उत्साहात स्वागत





**दैनिक आपला विदर्भ**

**बुलडाणा/प्रतिनिधी :** राजमाता माँ जिजाऊ व छत्रपती शिवरायांच्या विचारातील अठरापगड जाती धर्मातील मराठा समाजाने जिजाऊ शिव शाहू, फुले, आंबेडकर यांच्या विचारांची प्रेरणा घेऊन समता, समानता, बंधुता वादी विचारांचे ऐक्याचे वातावरण संपूर्ण महाराष्ट्रात निर्माण करावे, या करिता मराठा सेवा संघाच्या वतीने मराठा जोडी अभियाना अंतर्गत जिजाऊ रथयात्रा वेरूळ ते महाल पुणे पर्यंत काढण्यात आली. रथ यात्रा खामगाव होताच उत्साहात रथयात्रेचे मोठ्या जल्लोषात स्वागत करण्यात आले. तर यांनतर ही रथयात्रा महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्ह्यातून ४५ दिवस साडे सहा हजार पाचशे किलोमीटर चा प्रवास करून रथयात्रा पुणे येथे महाराष्ट्र दिनाच्या दिनी पोहोचणार आहे. गेल्या काही दिवसांपासून जाती जातीमध्ये संघर्ष, प्रबोधनाच्या माध्यमातून झालेला ओलावा असेल, कुठेतरी कमी होताना दिसून येत आहे. यासाठी फुले, शाहू, आंबेडकर या विचारधारे मध्ये कुणबी मराठा अशा अठरापगड जाती एकत्र करण्याचे काम या मराठा जोडो अभियानांतर्गत जिजाऊ रथयात्रेदरम्यान करण्यात येत आहे.